# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

नागपूर विभागीय मंडळ, सिव्हील लाईन्स, नागपूर. – 440001

msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in


**महत्वाचे / तातडीचे**

पत्र क्र. नाविम / मागो / प्रात्यक्षिक / 3927
नागपूर, दिनांक: २० / १० / 2022

प्रति,
मुख्याध्यापक,
मंडळ कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त शाळा,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. 10वी) मार्च 2023 करिता परिक्षक / समीक्षक यांचे शिक्षकांचे पॅनल फॉर्म अद्यावत करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. 10वी) मार्च 2023 लिखित उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी तसेच प्रात्यक्षिक विषयांचे अंतर्गत व बहिर्गत शिक्षकांचे पॅनल फॉर्म अद्यावत करावयाचे आहे.

मार्च 2023 च्या माध्यमिक प्रात्यक्षिक परीक्षेकरिता संबंधित विषय शिकविणा–या शिक्षकांची माहिती सेवा जेष्ठतेनुसार सोबत दिलेल्या पॅनल फॉर्ममध्ये भरून अचूक असल्याची खात्री करून संबंधित विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेवून स्वतंत्र पाकीटात द्यावी. तसेच परिक्षक / समिक्षकांचे शाखा निहाय पॅनल फॉर्म दि.11 / 11 / 2022 पर्यत टपालाव्दारे पाठविण्यात यावे. जेणेकरून प्रात्यक्षिक परीक्षेकरिता अंतर्गत व बहिर्गत परीक्षकांची नेमणूक करण्यात अडचण निर्माण होणार नाही. जर एक शिक्षक एकापेक्षा जास्त विषय शिकवित असेल तर प्रत्येक विषयाकरिता वेगवेगळया रकान्यांमध्ये स्वतंत्रपणे पॅनल फॉर्ममध्ये माहिती देण्यात यावी.

शिक्षकांच्या माहिती मध्ये काही बदल झाले असल्यास जसे की शिक्षकांची बदली / सेवानिवृत्ती / सेवा सोडून गेलेले शिक्षक / नवीन शिक्षकांची नावे इत्यादी नमुद करावी.

मंडळाच्या असे निदर्शनास आले की, विनाअनुदानित / स्वंयअर्थसहायित माध्यमिक शाळांतील शिक्षक ऐनवेळेवर उत्तरपत्रिका तपासणीच्या वेळी सेवा सोडून गेल्याचे किंवा सेवेतून कमी केल्याचे कळविले जाते. त्यामुळे मंडळाच्या कामात अडचण निर्माण होवून निकालाच्या प्रक्रियेला विलंब होतो. ज्याअर्थी शाळेने इ. 10वी करीता विद्यार्थी प्रविष्ठ केले त्याअर्थी त्यांचे अध्यापन व मुल्यमापन करणे हे संबंधित (शिक्षकांचे) अध्यापकाचे कर्तव्य व जबाबदारी राहील. एखाद्या शिक्षकाचा मृत्यु झाला असल्यास याबाबत त्वरित मंडळ कार्यालयातील संबंधित शाखेला कळविण्यात यावे.

शिक्षकांची चुकीची वा अपूर्ण माहिती दिल्यास आपण मंडळाची दिशाभूल करीत असल्याचे निदर्शनास आले तर, महाराष्ट्र खाजगी शाळांतील (सेवेच्या शर्ती) नियमावली 1981 च्या नियमातील तरतुदीनुसार संस्थेला आपणाविरूध्द कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात येतील, तसेच आपल्या शाळेचा सांकेतांक गोठविण्यात येईल. याची मुख्याध्यापकांनी नोंद घ्यावी.

सहपत्र :–
पॅनल फॉर्म /
माहिती तंत्रज्ञान / प्रात्यक्षिक पॅनल फॉर्म

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रत माहितीस्तव :–

1) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.
2) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली व गोंदिया यांना माहितीस्तव.

| मुख्याध्यापक भ्रमणध्वणी | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| शाळा सांकेतांक | | | |
|---|---|---|---|

Email address-------------------------

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नागपूर विभागिय मंडळ, नागपूर

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ10वी )प्रात्याक्षिक परीक्षा मार्च 2023 करीता विज्ञान व तंत्रज्ञान (72) या विषय शिक्षकांच्या माहितीबाबत व पॅनल फार्म

| अ. क | विज्ञान व तंत्रज्ञान विषय शिक्षकांची नावे | नियुक्ती दिनांक | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | अध्यापनाचा अनुभव(वर्ष) | निवृत्तीचा दिनांक | शाळेचा प्रकार (अनुदानित/कायम विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यीत, अंशता अनुदानित) | शिक्षणाधिकारी यांची वैयक्तिक मान्यता आहे/नाही असल्यास आदेश कमांक व दिनांक(छायाप्रत जोडावी) | भ्रमणध्वनी कमांक | अध्यपनाचा विषय व कोड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | |

(आवश्यकता पडल्यास पॅनल फॉर्मच्या छायाप्रती काढाव्यात )

मुख्याध्यापक
सही व शाळेचा शिक्का

| मुख्याध्यापक भ्रमणध्वणी | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

Email address------------------------

| शाळा सांकेतांक | | | |
|---|---|---|---|

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नागपूर विभागिय मंडळ, नागपूर

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ10वी )प्रात्याक्षिक परीक्षा मार्च 2023 करीता मेकॅनिकल टेक्नॉलॉजी (91) व इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी (92)या विषय शिक्षकांच्या माहितीबाबत व पॅनल फार्म

| अ. क | विज्ञान व तंत्रज्ञान विषय शिक्षकांची नावे | नियुक्ती दिनांक | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | अध्यापनाचा अनुभव(वर्ष) | निवृत्तीचा दिनांक | शाळेचा प्रकार (अनुदानित/कायम विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यीत, अंशता अनुदानित) | शिक्षणाधिकारी यांची वैयक्तिक मान्यता आहे/नाही असल्यास आदेश क्रमांक व दिनांक(छायाप्रत जोडावी) | भ्रमणध्वनी क्रमांक | अध्यपनाचा विषय व कोड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | |

(आवश्यकता पडल्यास पॅनल फॉर्मच्या छायाप्रती काढाव्यात )

मुख्याध्यापक
सही व शाळेचा शिक्का